तरुण भारत गुरूवार, १६ सप्टेंबर २०२१



नेसरी : रवळनाथ कडून आयोजित सभासद प्रशिक्षण कार्यशाळेत बोलताना डॉ. विजय ककडे. शेजारी एम. एल. चौगुले, डॉ. ए. एम. गुरव, ॲड. एस. एस. गडगे, शाखा चेअरमन आर. बी. पाटील.

# सहकार चळवळीत माणूस महत्त्वाचा

- डॉ. विजय ककडे यांचे प्रतिपादन
- रवळनाथ संस्थेचे सभासदांना प्रशिक्षण

वार्ताहर
नेसरी

सर्वसामान्य माणसाचा आर्थिक, सामाजिक स्तर उंचावणे हाच सहकार चळवळीचा मुख्य उद्देश असून कार्पोरेट कंपन्यांमध्ये भांडवल महत्वाचे तर सहकारात भांडवलापेक्षा माणूस महत्वाचा आहे. त्यामुळे सभासद, ठेवीदार, कर्जदार आणि ग्राहक यांचे हित डोळ्यासमोर ठेवून वाटचाल केल्यास सहकारी संस्था मोठ्या होतील असे प्रतिपादन अर्थशास्त्राचे जेष्ठ अभ्यासक डॉ. विजय ककडे यांनी केले.

येथील श्री रवळनाथ को- ऑप हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे आयोजित सभासद प्रशिक्षण कार्यशाळेत ते बोलत होते. दिल्ली येथील राष्ट्रीय सहकारी संघाच्या सहकार्याने ही कार्यशाळा संपन्न झाली. शिवाजी विद्यापीठ आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे प्र. संचालक डॉ. ए. एम. गुरव, जेष्ठ कायदा सल्लागार ॲड एस. एस. गडगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. ककडे म्हणाले, कोणत्याही संस्थेच्या प्रगतीसाठी आपल्या अधिकार आणि हक्कांबाबत जागृक असणाऱ्या सभासदांची गरज आहे. त्यासाठी वेळोवेळी प्रशिक्षण शिबिरे घेण्याचा रवळनाथचा उपक्रम स्तुत्य आहे. ॲड. गडगे यांनी मल्टीस्टेट कायदा आणि कर्जवसुली या विषयावर तर डॉ. गुरव यांनी सभासदांचे हक्क, कर्तव्य आणि जबाबदारी या विषयावर विवेचन केले. संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या यशस्वी वाटचालीचा आढावा घेतला. नेसरी शाखा चेअरमन आर. बी. पाटील यांनी स्वागत केले. उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, संचालक प्राचार्य डॉ. एस. आर. निळपणकर, महेश मजती, मिना रिंगणे, उमा तोरगल्ली, रेखा पोतदार, सीईओ डी. के. मायदेव, शाखा सल्लागार डॉ. डी. एम. पाटील, मुख्याध्यापिका शमा कुरणे, माजी प्राचार्य एस. एस. मटकर, जे. व्ही. निचळ, प्र. प्राचार्य डॉ. एस. बी. भांबर, पांडूरंग करंबळकर, एच. जी. देसाई, वसंत दळवी, मारुती रेडेकर, शशिकला पाटील, उज्ज्वला नाईक, शाखाधिकारी किरण कडोळी यांच्यासह ६५ सभासदांनी प्रशिक्षण कार्यशाळेत सहभाग घेतला. प्रातिनिधिक स्वरूपात सभासदाना प्रमाणपत्र वितरण झाले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते श्री रवळनाथ प्रतिमेचे पूजन व वृक्षाला पाणी घालून शिबिराचे उद्घाटन झाले. पंच्याहत्तरी पूर्ण केलेले सभासद आणि विविध परीक्षेतील यशवंत सभासद पाल्यांचा सत्कार झाला. संजय कालकुंद्रीकर यांनी सूत्रसंचालन केले. नेसरी शाखा सल्लागार डॉ. व्ही. के. दळवी यांनी आभार मानले.

## सभासदांचा सन्मान करणारी संस्था

संस्था सभासदांसाठी आणि सभासद संस्थेसाठी या तत्वाने वाटचाल करणारी रवळनाथ ही सभासदांचा सन्मान करणारी संस्था आहे. त्यामुळेच सभासदही अभिमानाने रवळनाथचे नाव घेतात अशा शब्दात डॉ. ककडे यांनी यावेळी रवळनाथच्या यशस्वी वाटचालीचे कौतुक केले.


SHREE RAVALNATH CO-OP. HOUSING FINANCE SOCIETY LTD., AJARA (MULTI-STATE)
Head Office: Doctors' Colony, Gadhinglaj, Dist. Kolhapur ( Maharashtra)
Silver Jubilee
ORGANIZES
Members' Education Programme
(Sponsored by : National Cooperative Union of India, New Delhi)
On The Theme
"Rights & Responsibilities of Members as per Multi-State Act., 2002 & Implications of COVID-19 on Multi-State Co-op. Societies"
DATE & TIME
Wednesday
8th September 2021
at 9.30 a.m.
INAUGURATION & KEY NOTE ADDRESS
Hon. Prof. Dr. Vijay Kakade
RESOURCE PERSONS
Hon. Prof. Dr. A. M. Gurav
Hon. Adv. S. S. Gadge
VENUE
Hotel Sarthak,
NESARI
Shri. D. K. Maydeo
CEO
YOURS
Prin. R. B. Patil
All Directors & Advisors
SHREE RAVALNATH
1996-2021
25 Years
Silver Jubilee
SHREE RAVALNATH
CO-OP. HOUSING FINANCE
SOCIETY LTD., AJARA (MULTI-STATE)
Head Office : Doctors' Colony, Gadhinglaj,
Dist. Kolhapur. (Maharashtra)